सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# महिला व बाल विकास विभाग
# महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -01

## सरळसेवा भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२४

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट- ड या संवर्गातील (१) संरक्षण अधिकारी गट ब (अराजपत्रित)-२ पदे (२) परिविक्षा अधिकारी, गट क -७२ पदे (३) लघुलेखक (उच्चश्रेणी) गट क १ पद (४) लघुलेखक (निम्नश्रेणी) गट-क-२ पदे (५) वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहायक, गट-क- ५६ पदे (६) संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क -५७ पदे (७) वरिष्ठ काळजी वाहक गट-ड ४ पदे (८) कनिष्ठ काळजी वाहक गट-ड- ३६ पदे (९) स्वयंपाकी गट-ड- ६ इत्यादी भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमूद सरळसेवा कोट्यातील रिक्त असलेली पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सरळसेवा भरती प्रक्रियेशी संबंधित सविस्तर जाहिरात व ऑनलाइन अर्ज भरण्याबाबतची सुविधा महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे च्या https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर दिनांक १४-१०-२०२४ पासून उपलब्ध होणाऱ्या लिंकवर उपलब्ध करून दिली आहे. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचून केवळ ऑनलाइन पध्दतीनेच अर्ज सादर करावेत. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरिता केवळ उक्त संकेस्थळावरुन ऑनलाइन पध्दतीने भरलेला अर्ज व ऑनलाइन पध्दतीने भरण्यात आलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज / परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाही.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व कार्यक्रम वेळापत्रक, वेळापत्रकातील बदल इत्यादी सूचना https:// www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही स्वतंत्रपणे व्यवहार करण्यात येणार नसून सदर संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

| | |
|---|---|
| **ऑनलाइन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा सुरवात दिनांक** | **दिनांक १४-१०-२०२४ दुपारी १५.०० वाजे. पासून** |
| **ऑनलाइन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ०३-११-२०२४ रात्री २३.५५ वाजे. पर्यंत** |

उक्त भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, सामाजिक, समांतर, दिव्यांग व इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय / पदनिहाय बदल करण्याचे, सरळ भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**स्वा/-**
**(डॉ. प्रशांत नारनवरे) भा.प्र.से**
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**स्थळ - पुणे**
**दिनांक १०-१०-२०२४**

**[DGIPR-2024-25/क्र-5/C-4285]**